**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**
**वनभवन, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४०००१**

**ई-मेलव्दारे/पत्र**

क्रमांक : कक्ष-१०(२)/एक/प्र.क्रं.८१(१६-१७)/ ४११०
नागपूर ४४०००१, दिनांक: १३/१२/२०१८

मुख्य वनसंरक्षक (प्रा) ठाणे वनवृत्त ठाणे यांचे कार्यालय
कक्ष क्रमांक : ७
दिनांक 13 DEC 2018
आवक क्रमांक : A/2886
प्रशासकीय अधिकारी मुख्य वनसंरक्षक, ठाणे

विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या वनरक्षक व पदोन्नत वनपाल यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगति योजनेचा दुसरा लाभ लागू न करण्याबाबत

संदर्भ:- शासन पत्र क्र.एस-३०/०४/१६/प्र.क्र.१२७/फ-४, दिनांक १२/१२/२०१८

मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्र.१००४/२०१५ श्री. श्रीरंग लक्ष्मण देवरे व इतर ७२ विरूध्द महाराष्ट्र शासन या प्रकरणी दिनांक १८/९/२०१७ रोजी दिलेल्या आदेशा विरूध्द शासनाच्यावतीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ८२२/२०१८ व्दारे अपील दाखल करण्यात आले होते. त्यावर मा. उच्च न्यायालयाने दिनांक ७/२/२०१८ रोजी दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने संदर्भिय शासन पत्र दिनांक १२/१२/२०१८ अन्वये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या वनरक्षक /वनपाल यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगति योजनेच्या दुसऱ्या लाभांतर्गत दिलेल्या अतिप्रदानाच्या रक्कमेची वसूली करण्यात येऊ नये असे निर्देश प्राप्त झालेले आहे. शासनाने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी, ही विनंती.

सहपत्र:- शासन पत्र दि. १२/१२/२०१८

(ए.आर.मंडे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन दुय्यम संवर्ग)

--- ००० ---

कक्ष-७(१)/१२/आस्था/जा. ९३७८ /२०१८-१९.
ठाणे-४०० ६०३, दिनांक :- १८/१२/२०१८.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) मुंबई यांचेकडे माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी सादर.
प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष) मुंबई यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी सादर.
प्रतिलिपी :- मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्टीय उद्यान, बोरीवली यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी :- वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, ठाणे यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी :- वनसंरक्षक, कार्य आयोजना डहाणू स्थित कोकण भवन यांचेकडे माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रतिलिपी :- उपवनसंरक्षक ठाणे, डहाणू, जव्हार, शहापूर, अलिबाग, रोहा, वन्यजीव ठाणे, भूमि अभिलेख पनवेल, सहाय्यक अनुवंशशास्त्रज्ञ, वन अनुसंधान केंद्र वाडा, संचालक, वनप्रशिक्षण संस्था शहापूर, वन जमाबंदी अधिकारी, कोकण, विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण ठाणे व रायगड यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**मुख्य वनसंरक्षक (प्रा). ठाणे**

# महाराष्ट्र शासन

क्रमांक :-एस-३०/०४/१६/प्र.क्र.१२७/फ-४
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ डिसेंबर, २०१८

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग),
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**विषय :-** माध्यमीक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण नसलेल्या वनरक्षक व पदोन्नत वनपाल यांना सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेच्या दुसऱ्या लाभांतर्गत दिलेल्या अतिप्रदानाच्या रक्कमेची वसूली न करणेबाबत.

**संदर्भ :-** प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे क्र.कक्ष-१०(२) /आस्था /एक /प्र.क्र.८१(१६-१७) /३०, दि.१७.०४.२०१८ व दि.२९.१०.२०१८ रोजीचे पत्र

महोदय,

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्र.१००४/२०१५ श्री.श्रीरंग लक्ष्मण देवरे व इतर ७२ विरुध्द महाराष्ट्र शासन या प्रकरणी दि.१८.०९.२०१७ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द शासनाच्यावतीने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.८२२/२०१८ द्वारे अपील दाखल करण्यात आले होते. सदर रिट याचिकेबाबत मा.उच्च न्यायालयाने दि.०७.०२.२०१८ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत:-

1. *In this view of the matter, in our opinion decision of the Hon'ble Supreme Court in Rafiq Masih's case will not be applicable in the case of respondents as this was not a case where the benefit of second ACP was mistakenly granted to the respondents. The respondents were well aware that benefit of second ACP is given to them subject to fulfilling the eligibility of G.R. dated 01/04/2010 and subject to the decision on the proposal submitted for relaxing the eligibility. Grant of benefit of second ACP is not a matter of right but subject to fulfilment of the eligibility mentioned in the G.R. dated 01/04/2010. The respondents also furnished an undertaking to this effect.*

2. *In our opinion, therefore the impugned order passed by the Tribunal needs to be interfered with.*

*3. It is however pointed out that of the 73 respondents, 28 have already retired and many of respondents are on the verge of superannuation. As the petitioners have already effected some recovery, in the interest of justice, we direct that no further recovery shall be made from the respondents.*

*4. Subject to what is stated hereinabove, Rule is made absolute in terms of prayer clause (a) with order no as to costs.*

२. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.८२२/२०१८ मध्ये दि.०७.०२.२०१८ रोजी दिलेल्या उपरोक्त निर्णयानुसार माध्यमीक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण नसलेल्या वनरक्षक / वनपाल यांना सुधारीत आश्वासीत प्रगती योजनेच्या दुसऱ्या लाभांतर्गत दिलेल्या अतिप्रदानाच्या रक्कमेची वसूली करण्यात येऊ नये. त्याअनुषंगाने आपल्या अधिनस्त सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सुचना देण्यात याव्यात. सदर पत्र वित्त विभागाच्या मान्यतेने व त्या विभागाच्या अनौ./सं.क्र.४६४/१८/सेवा-३, दि.२९.१०.२०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

आपला,

(बा.सि.शिंदे)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत :-

सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)